# रोजगार हमी योजने अंतर्गत जवाहर विहीर कार्यक्रम

## अ) ठळक बाबी

१) योजनेचे उद्दिष्ट :- पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या कोरडवाहू शेतक-याचे शेतामध्ये विहीर खोदून त्याचे जिवनमान उंचावण्यासाठी सदर योजनेची सुरुवात सन ८८-८९ पासून करण्यात आलेली आहे. सदरची योजना ही रोजगार हमी योजने अंतर्गत आहे.

२) योजनेसाठी पात्र लाभार्थी :- सदरचे योजने अंतर्गत विहीरीचे लाभार्थी निवडी संदर्भात सध्या प्रचलित शासन निर्णयानुसार ३ प्रवर्ग देण्यात आलेले आहेत व जिल्हयाला प्राप्त होणारे उद्दिष्ट सदरचे ३ प्रवर्गामध्ये विभागण्यात येते .

| अ.क्र. | प्रवर्ग | एकुण लक्षांकापैकी टक्केवारी |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय अल्पभूधारक ( ०.६० ते २ हेक्टर क्षेत्र ) | २० % |
| २ | अमागासवर्गीय अल्पभूधारक (०.६० ते २ हेक्टर क्षेत्र ) | ४०% |
| ३ | नाबार्ड प्रवर्ग ( २ हेक्टर वरील क्षेत्र ) | ४० % |

## ब) अंमलबजावणी

**१ )लक्षांक वाटपाची कार्यपध्दती :-** शासनाकडून जिल्हयास देण्यात आलेल्या एकुण लक्षांकाचे तालुकानिहाय वाटप करताना शासन मार्गदर्शक सूचनेनुसार खालील मुद्दयांचा विचार करुन तालुका निहाय वाटप करण्यात येते.

क) तालुक्यातील पिकाखाली असलेल्या एकूण क्षेत्राच्या प्रमाणात - २५%

ख) मागासवर्गीय अल्पभूधारक शेतक-यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात - २५ %

ग) मागासवर्गीयेतर अल्पभूधारक शेतक-यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात - २५ %

घ) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या अहवालानुसार तालुक्यात शक्य असलेल्या एकूण विहीरीच्या संख्येच्या प्रमाणात - २५ %

**२)लक्षांकाप्रमाणे लाभार्थी निवडीची प्रक्रीया :-** या योजनेतून लाभ घेणारे इच्छुक लाभार्थी विहीत नमुन्यातील अर्ज ग्रामपंचायतीकडे सादर करतात. सदरचे अर्ज ग्रामपंचायतीकडून संबंधित पंचायत समितीला सादर केल्या नंतर अर्जाची छाननी केली जाते व पात्र लाभार्थ्याची यादी तयार करुन संबंधित शेतक-यांचे गटामध्ये जुनी विहीर नसलेची खात्री करुन घेणेसाठी सदरची यादी कृषी कार्यालयाकडे पाठवून क्षेत्रिय पाहणी केली जाते. त्यानंतर क्षेत्रिय पाहणीत पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांची यादी तालुका समन्वय समितीच्या सभेमध्ये सादर करुन तालुका समन्वय समितीच्या शिफारसीसह तालुक्यास देण्यात आलेल्या लक्षांकाच्या दुप्पट पात्र लाभार्थ्यांची यादी जिल्हास्तरावर कार्यकारी अभियंता ल.पा. (स्थास्तर) यांचेकडे पाठवली जाते. प्रस्तुतची यादी मा. पालकमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील जवाहर विहिर लाभार्थी निवड जिल्हा समन्वय समितीच्या सभेसमोर ठेवून त्यास तालुक्याच्या लक्षांकाप्रमाणे लाभार्थ्यांची निवड केली जाते. सदर सर्व प्रक्रियेसाठी १४१ दिवसांचा कालावधी विहीत करण्यात आलेला आहे.

**३) प्रशासकीय व तांत्रिक मान्यता :-** जवाहर विहीर जिल्हा निवड समितीने मंजूरी दिलेल्या लाभार्थ्यांची यादी गट विकास अधिकारी व उप अभियंता ल.पा. (स्थास्तर) यांना कळवली जाते. उपअभियंता हे प्रत्येक प्रकरण निहाय अंदाजपत्रक तयार करतात त्यास कार्यकारी अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिल्यानंतर गटविकास अधिकारी हे कार्यारंभ आदेश देतात.

**४)काम करुन घेण्याची कार्यपध्दती :-** गट विकास अधिकारी यांचे प्रशासकीय मान्यतेनंतर संबंधित शेतक-याकडून पुन्हा ७/१२ , ६ड ,८अ इ. उतारे घेऊन संबंधित लाभार्थी पात्र असल्याची खात्री करुन लाभार्थ्याकडून विहीत नमुन्यात करारनामा करुन घेतला जातो. कामाची आखणी देऊन काम सुरु करणेसाठी मंजूर अनुदानाच्या १० % इतकी रक्कम अग्रीम म्हणून लाभधारकास देण्यात येते.

त्यानंतर वेळोवेळी कामांना भेट देऊन संबंधित क. अभियंता/ शा. अभियंता हे मोजमापे घेऊन झालेल्या कामांचे मोजमाप नोंदवून लाभार्थ्यास गटविकास अधिकारी यांचेमार्फत रक्कम अदा करतात.

सध्याच्या प्रचलित शासन आदेशानुसार विहीर मंजूर झाल्यानंतर दोन महिन्यात लाभार्थ्याने विहीरीचे काम सुरु करणे आवश्यक असून एकूण १४ महिन्यात काम पूर्ण करणे आवश्यक आहे. तथापि अपूर्ण विहीरी पूर्ण करणेसाठी वेळोवेळी शासनाकडून मुदतवाढ देणेत येते.

**५)अनुदान / निधी वाटपाबाबत :-** सन ८८ - ८९ मध्ये सुरुवातीला सदर विहीरी योजनेसाठी रु. २३०००/- इतके अनुदान होते ते त्यानंतर वेळोवळी वाढवत जाऊन १० एप्रिल २००८ पासून रु. १,००,०००/- करणेत आले आहे.

उपविभागाकडून अपूर्ण विहीरी पूर्ण करणेसाठी व सुरु न झालेले विहीरी सुरु करण्यासाठी लागणा-या निधीची मागणी विहीत प्रपत्रात करण्यात येते त्यास अनुसरुन जिल्हयाची एकत्रित मागणी मा. जिल्हाधिकारी यांचेमार्फत नियोजन विभागास सादर केली जाते. निधी प्राप्त झाल्यानंतर तालुक्याचे मागणीनुसार तालुक्यांना वाटप करण्यात येते. तालुका स्तरावर गटविकास अधिकारी यांचेमार्फत संबंधित शेतक-यास मुल्यांकनाप्रमाणे रक्कम अदा केली जाते.

**६) तपासणी :-** संबंधित तालुक्यातील क. अभियंता / शा. अभियंता हे वेळोवळी कामांना भेटी देऊन लाभार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करतात, झालेल्या कामांचे मुल्यांकन नोंदवतात. उप अभियंता अशा कामांची तपासणी करुन देयक पारित करण्यास शिफारस करतात. पूर्ण होणा-या विहीरींची ५ % विहीरींची तपासणी कार्यकारी अभियंता यांनी कराव्यात अशा सूचना आहेत.

**क) प्रगती**

या जिल्हयासाठी सन ८८-८९ ते २००४-०५ अखेर एकूण ६९६६ विहीरींचा लक्षांक देण्यात आलेला होता.एकूण ६९६४ विहीरींना मंजूरी देण्यात आलेली असून डिसेंबर २००७ अखेर एकूण ६२७० विहीरींची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. ६८१ विहीरींची कामे रद्द करण्यात आलेली असून १३ विहीरी निष्फळ ठरलेल्या आहेत.

सन २००७-०८ साठी सोलापूर जिल्हयासाठी एकूण १९३० विहीरीचा लक्षांक प्राप्त झालेला होता प्राप्त लक्षांकानुसार , तालुकानिहाय निश्चीत करणेत आलेल्या लक्षांकाप्रमाणे १९३० विहीरींना मंजूरी देणेत आलेली आहे .

## रोजगार हमी योजना / महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना

**१ ) रोजगार हमी योजना :-** ग्रामीण भागाची सुयोग्य विकासाचे धोरण आखून उपलब्ध मानवी संपत्ती द्वारा ग्रामीण भागात टिकाऊ सामुहिक मालमत्ता निर्माण करीत असतानाच ग्रामीण भागात राहणा-या व अंगमेहनतीची अकुशल कामे करणा-या मजूरांना रोजगार उपलब्ध व्हावा हे प्रमुख उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून रोजगार हमी योजना १९७२ पासून सुरु करण्यात आली आणि भारतीय संविधानाचा अनुच्छेद ४१ मध्ये काम करण्याच्या हक्कासंबंधी असलेली निर्देशित तत्त्वे लक्षात घेऊन महाराष्ट्र रोजगार हमी कायदा १९७७ च्या रुपाने त्यास २६ जानेवारी १९७९ पासून संवाधनिक स्वरुप देण्यात आले. सन २००६ साली या कायदयात सुधारणा करणेत आलेल्या असून सन २००६ पासून ही योजना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना या नावाने संबोधले जाते . दि.१९ ऑक्टोंबर २००६ चे नियोजन विभागाकडील शासन निर्णयातील सुचनेनुसार या योजनेअंतर्गत अनुज्ञेय कामामध्ये या विभागाकडील खालील कामांचा समावेष आहे .

१) पाझर तलाव / गांव तलाव
२) भुमिगत बंधारा
३) तलावातील गाळ काढणे
४) जुन्या तलावाचे नुतनीकरण
५) अनुसुचित जाती / जमाती , नविन भुधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभर्थ्याच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे .

**कामाची अंमलबजावणी / नियोजन**

१) **नियोजन आराखडा :-** म.ग्रा.रो.ह.यो. चा पुढील आर्थीक वर्षाचा आराखडा ( १ एप्रिल ते ३१ मार्च ) चालू आर्थीक वर्षात ३१ डिसेंबर पर्यंत करणेच्या सुचना आहेत .

२) **कामे राबविणे :-** किमान ५० % कामे ग्रामपंचायतीमार्फत राबविणे बंधनकारक असून ५० % कामे यंत्रणामार्फत राबवावयाची आहेत .

३) **कामाचे अंदाजपत्रकांना तांत्रीक मंजूरी :-** म.ग्रा.रो.ह.यो.अंतर्गत या विभागाकडील उपरोक्त अनुज्ञेय कामांना ( तलावातील गाळ काढणे व नुतनीकरण ही कामे वगळता ) या विभागाक्डील उपविभागीय अभियंता यांना प्रत्येक कामासाठी रू .५.०० लक्ष पर्यंतचे कामांचे अंदाजपत्रकांना तांत्रीक मान्यता देणेचे अधिकार असून कार्यकारी अभियंता यांना रू २५.०० लक्ष पर्यंतचे कामांचे अंदाजपत्रकांना तांत्रीक मान्यता देणेचे अधिकार प्रदान करणेत आलेले आहेत .गाळ काढणे व नुतनीकरणाचे कामासाठी उपअभियंता यांना अधिकार नसुन ही मर्यादा कार्यकारी अभियंता यांना रू ५.००लक्ष पर्यंत आहे

## कोल्हापूर पध्दतीचे बंधारे

**कोल्हापूर पध्दतीचे बंधारे :-** २७०२ ल.पा. या योजनेखाली घेण्यात आलेल्या सर्व पाझर तलावाचे कामे पूर्ण झाली असल्याने व अनुशेष या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झालेले अनुदान खर्च करण्याच्या उद्देशाने जिल्हा नियोजन व विकास मंडळाने सन १९८८-८९ मध्ये १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या छोटे कोल्हापूर पध्दतीचे बंधा-याची कामे करण्यासाठी जिल्हा परिषदेस सूचविले वरुन या विभागामार्फत कोल्हापूर पध्दतीचे बंधा-याची कामे सुरु करण्यात आली आहेत.

या को.प.बंधा-याचे अंदाजपत्रके सुरुवातीला जिल्हा परिषदेकडून केली जात असत. नंतर १९९२ पासून शासनाच्या आदेशानुसार राज्यस्तरीय लघुपाटबंधारे विभागाकडून सर्वेक्षण करून अंदाजपत्रके तयार करून ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेची कामे कार्यान्वित करणेसाठी या विभागाकडे पाठविण्यात येतात. ग्रामविकास व जलसंधरण विभागाकडील दि.३१ जुलै २००० चे शासन निर्णयानुसार ज्या को.प.बंधा-याचे लाभधारक शेतक-यांनी पाणी वापर संस्था स्थापन केलेली आहे व बंधा-याचे काम पुर्ण झाल्यानंतर बंधारा देखभाल व दुरूस्तीकरीता ताब्यात घेणेबाबत सहमती दर्शवलेली आहे अशीच काम हाती घेणेत येतात . नियोजन विभागाकडील दि. ४ मार्च २००३ चे परिपत्रकानुसार को.प.बंधा-याची कामे संधानकात करणेत येत आहेत .ग्रामविकास व जलसंधरण विभागाकडील दि.२७ नोव्हेंबर २००३ चे परिपत्रकानुसार ३० हेक्टर पेक्षा जास्त सिंचन क्षमतेची को.प.बंधारेची काम हाती घेणेत येतात . तसेच जिल्हा नियोजन विकास मंडळाकडे मंजूरीसाठी कामाचा प्रस्ताव पाठविल्यानंतर व या प्रस्तावास त्यांचेकडून मंजूरी मिळाल्यानंतर अंदाजपत्रकाच्या किंमतीनुसार जिल्हा परिषदेच्या सक्षम समितीकडून प्रशासकी मंजूरी घेतली जाते. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील दि. १५ जूलै २००८ अन्वये प्रशासकीय मान्यतेचे अधिकार खाली नमूद केले प्रमाणे आहेत.

१) उप अभियंता -- रु. १,००,०००/- पर्यत २) कार्यकारी अभियंता -- रु. १,००,०००/- ते रु. ५,००,०००/- पर्यत

३) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी -- रु. ५,००,०००/- ते रु. २०,००,०००/- पर्यत -- नंतर स्थायी / विषयसमिती यांना कळविणे बंधनकारक आहे.

४) अध्यक्ष स्थायी समिती -- रु. २०,००,०००/ ते रु. २५,००,०००/- पर्यत -- नंतर स्थायी / विषय समिती यांना कळविणे बंधनकारक आहे.

५) सभापती विषय समिती -- रु. २०,००,०००/- ते रु. २३,००,०००/-पर्यत -- नंतर स्थायी /विषय समितीस कळविणे बंधनकारक आहे.

६) विषय समिती -- रु. २३,००,०००/- ते रु. ३०,००,०००/- पर्यत

७) स्थायी समिती -- रु. २५,००,०००/- ते रु. ५०,००,०००/- पर्यत ८) जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा -- पूर्ण अधिकार

९) जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीस (विषय समिती ) स्थायी समितीचे अधिकार दिलेले असलेने या समितीची मंजूरी घेण्यात येत असून याची मर्यादा रु. २५,००,०००/- ते रु. ५०,००,०००/- पर्यत आहे.

प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर मजूर सहकारी संस्था / सुशिक्षित बेरोजगार अभियंता / वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून योग्य निविदेस सक्षम स्तरावरुन मंजूरी घेऊन कामे सुरु केली जातात.

वरील कामे स्पेशिफिकेशन प्रमाणे करुन घेणेची मूळ जबाबदारी शाखा अभियंता व उप अभियंता यांची आहे. रु. ५०,०००/- पेक्षा जास्त काम झाल्यावर या कामांची ५ % तपासण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची असून तपासणी झाल्याशिवाय मक्तेदारांना बिले दिली जात नाहीत.

**प्रगती :-** मार्च २००९ अखेरपर्यत एकूण ६८२ कामे पुर्ण झालेली असून , ३० कामे प्रगतीत होती.सन २००९-१० मध्ये ५ कामे हाती घेणेत आलेली आहेत .

## सिमेंट बंधारे

ल.पा.योजने अंतर्गत सन २००५-०६ चे नियोजन आराखडयात जलबांधाची कामे घेणेबाबत प्रायोगीक तत्वावर प्रत्येक तालुक्यातुन १ काम नियोजन आराखडयात प्रस्तावित करणेत आले होते .तथापि सदरचे कामाऐवजी सिमेंट बंधारेची कामे घेणेबाबत जिल्हा नियोजन व विकास समितीचे सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार जलबांधाचे कामाऐवजी सिमेंट बंधारेची कामे घेणेबाबतचा प्रस्ताव मंडळ कार्यालयास सादर करणेत आलेला होता.सदरचे प्रस्तावास मंडळ कार्यालयाने दि.१६.११.२००५ चे पत्रान्वये सिमेंट बंधारेची अंदाजपत्रके नियोजन विभागाकडील दि.२८ जूलै २००५ चे पत्रातील संकल्पनेनुसार करणेची मान्यता दिली होती . दि.२८ जूलै २००५ चे परिपत्रकातील संकल्पनेनुसार सिमेंट बंधारेची काम केल्यास खर्चात वाढ होत असल्याचे निदर्शनास आलेने सिमेंट बंधारेची कामे कृषी खात्याकडील मार्गदर्शक सुचनेनुसार संकल्पनेनुसार व दगडी बांधकामाचे ऐवजी एम -१० संधानक ( २० % प्लम्स सह ) व Surface ला ५ कि.ग्रॅ / चौ.मी इतकी सळई वापरून काम करणेस मान्यता मिळणेचा प्रस्ताव मंडळ कार्यालयास सादर करणेत आला होता .सदरचे प्रस्तावास मंडळ कार्यालयाकडून मान्यता मिळालेनंतर सिमेंट बंधारेची कामे घेणेत येत आहेत . सन २००८-०९ पासून सिमेंट बंधारे कामासाठी उपलब्ध होणारे अनुदान लोकसंख्येच्या प्रमाणात तालुक्यांना वाटप करून नियोजन आराखडयात प्रस्तावित केलेली कामे हाती घेणेत येत आहेत . सिमेंट बंधारे कामांचे सर्वेक्षण अंदाजपत्रक उपविभागामार्फत करणेत येते .या कामाबाबतचा तांत्रीक तपशिल खालीलप्रमाणे आहे .

**तांत्रिक तपशील**

१) पाणलोट क्षेत्र ४० हेक्टर पासून १००० हेक्टर पर्यंत असावे .
२) नाल्याचा तळाचा उतार ३ % पेक्षा जास्त असू नये .
३) नाल्याच्या तळाची रुदी ५० मी पेक्षा जास्त असू नये व नाल्याची रुंदी ५ मी पेक्षा जास्त असावी .
४) नाल्यास स्पष्टपणे खोली व दोन्ही बाजूस स्प्ष्ट तीर / काठ असावेत व काठापासून नाल्याच्या तळापर्यंत कमीत कमी खोली २ मी.असावी .
५) १.५० ते ५ मी पाणी उंचीपर्यंतची कामे घेता येतील .
६) मापदंड दि.१६ जूलै २००७ चे शासन निर्णयानुसार राहतील.
७) लाभधारकाची कामे घेणेबाबत सम्मती तसेच लाभधारक / ग्रामपंचायतींची काम पुर्ण झालेनंतर पुढील देखभाल व दुरूस्तीबाबत लेखी हमी आवश्यक .

**प्रगती :-** मार्च २००९ पर्यंत एकूण ६६ कामे पुर्ण झालेली असून ६९ कामे प्रगतीत होती .सन २००९-१० मध्ये १०० कामे हाती घेणेत आलेली आहेत .

# गॅबियन बंधारे

ज्या ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/ साठवण बंधारा इत्यादीसाठी आवश्यक असणारा कठीण भूस्तराचा पाया मिळत नाही तसेच पायामध्ये वाळू मिश्रीत भूस्तर असल्यास अशा नदी / नाला पात्रामध्ये गॅबियन बंधारे प्रस्तावित करता येऊ शकतात.

संकल्पीत पूर विसर्ग व्यवस्थितरित्या वाहून जाण्याचे दृष्टीने नदी / नाला तिराची उंची आवश्यक तेवढी असल्यास तसेच ज्या ठिकाणी नदी / नाला पात्र सरळ रेषेत आहे अशा ठिकाणी सदरचे बंधारे प्रस्तावित करता येऊ शकतात.

**तांत्रिक तपशील**

प्रस्तुत बंधा-यासाठी गाभा कवच, संरक्षक कवच व कोरडे दगडाचे बांधकाम व २०० Micron LDPE Film व G.I. Chain Link Mesh (२.५″X२.५″ X १० Gauge ) चा समावेश केलेला आहे.

१) बंधा-याची माथा रुदी ३.१० मी. असून या मध्ये गाभा कवच १.०० मी. संरक्षक कवच ०.३० मी. व कोरडे दगडी बांधकाम ०.७५ मी. चा समावेश आहे.

२) गाभा व संरक्षक कवचाचे उतार ०.५ :१ असून कोरडे दगडी बांधकामासाठी वरील बाजूस ०.५:१ व खालील बाजूस १:१ उतार आहे.

**कामाचे स्वरुप**

१) पायामध्ये साधारणपणे २ ते ३ .०० मी. इतक्या खोलीपर्यत वाळू मिश्रीत भूस्तरामध्ये खोदकाम करुन (उतार ०.५:१) खोदलेला भाग पुन्हा काळया मातीने नाला तळ पातळीच्या खाली ०.६० मी. इतक्या उंचीपर्यत भरुन घेणे.

२) भरावाचे वरील व खालील बाजूस ०.३० मी. संरक्षक कवच भरणे .

३) त्यानंतर त्यावर २.५″X२.५″ X १० Gauge G.I. Chain Link Mesh अंथरुण घेणे ( पूर्ण भरावाच्या रुंदीमध्ये )

४) भरावाचे वरील व खालील बाजूस ( गाभा कवचाचे तळाचे रुंदीचा भाग सोडून ) ०.३० मी. जाडीचे Quarry spouls भरणे .

५) गाभा व संरक्षक कवचाचे काम करणे .

६) २०० Micron LDPE Film ने सदरचे काम आच्छादून घेणे.

७) त्यानंतर भरावाचे खालील , वरील बाजूस व माथ्यावर कोरडे दगडी बांधकाम रचणे.

८) भरावाचे वरील बाजूस, खालील बाजूस व माथ्यावर दगडी बांधकामाचे वर २.५″X२.५″ X १० Gauge G.I. Chain Link Mesh बांधून घेणे . बांधाचे खालील बाजूस २.०० मी. रुंदीची चारी करणे , व त्यास कोरडे दगडी बांधकाम रचणे.

**उपयोग :-** ज्या ठिकाणी कठीण भूस्तराचा पाया खोल असल्यामुळे को.प.बंधारे / साठवण बंधारे घेता येत नाहीत. अशा नदी / नाला पात्रामध्ये प्रस्तुत गॅबियन बंधा-याची साखळी करुन कामे केल्यास त्यामुळे पाण्याचे पुनर्भरण होऊन भूगर्भातील पाण्याच्या पातळी मध्ये वाढ होऊ शकते. मंगळवेढा व पंढरपूर या दोन तालुक्यातील काही भागात जेथे वाळू मिश्रीत भूस्तर आहे किंवा कठीण भूस्तर लागत नाही अशा ठिकाणी ही कामे घेता येऊ शकतील.

**प्रगती -** या पध्दतीची कामे अदयाप घेणेत आलेली नाहीत